**आजचा सुविचार**

वेळ, सत्ता, संपत्ती आणि शरीर
साथ देवो न देवो,
परंतु चांगला स्वभाव आणि चांगले संबंध
कायम आयुष्यभर साथ देतात.

दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हॉट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२३ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# ग्रामस्थांवर सूडबुध्दीने केलेले खोटे गुन्हे मागे घ्या, अन्यथ तीव्र आंदोलन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** 'लोकशाहीत ग्रामपंचायतचा निर्णय सर्वोच्च असतो आणि प्रशासनाने त्याचा अवमान केल्यास ते खपवून घेतले जाणार नाही,' अशा कडक शब्दात खा. प्रतिभा धानोरकर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले.

वरोरा तालुक्यातील कोंढाळा-येन्सा येथील ग्रामस्थांच्या प्रलंबित मागण्या आणि 'श्री सिमेंट' कंपनीच्या मनमानी कारभारावर तोडगा काढण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी वरोरा उपविभागीय अधिकारी कार्यालयात खा. प्रतिभा धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत कोंढाळा गावाचे नियमानुसार पूर्ण पुनर्वसन आणि स्थानिक सुशिक्षित तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न प्रामुख्याने चर्चिला गेला. 'कंपनीने बाहेरील कंत्राटी कामगाराऐवजी स्थानिक भूमीपुत्रांना नोकरीत प्राधान्य देणे अनिवार्य आहे,' असा खंबीर पवित्रा घेत खा. प्रतिभा धानोरकर यांनी पुनर्वसनाची प्रकिया पूर्णपणे पारदर्शक करण्याच्या सूचना दिल्या. जमिनी देऊनही रोजगारांसाठी भटकणाऱ्या तरुणांना न्याय मिळालाच पाहिजे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

सर्वात महत्वाचे म्हणजे, आपल्या हक्कासाठी लोकशाही मार्गाने लढा देणाऱ्या निष्पाप ग्रामस्थांवर कंपनी प्रशासनाने सूडबुध्तादीने दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यासाठी प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी आग्रही मागणी खा. प्रतिभा धानोरकर यांनी केली. या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन बाधित ग्रामस्थांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा जनतेला सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी संदीप मस्के, तहसीलदार योगेश कौटकर, गटविकास अधिकारी गजानन मुंडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद भस्मे आणि ह्यामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मध्य रेल्वेची मोठी कारवाई!

## 'तत्काळ'चा काळाबाजार उघड, दोघांना रंगेहाथ पकडलं...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पुणे :** तत्काळ तिकीट काढण्यासाठी सर्वसामान्य रेल्वे प्रवाशांना मोठी कसरत करावी लागते. मात्र, अनेकदा वेबसाइट स्लो होणे, काही मिनिटांतच सर्व तिकिटे संपणे असे प्रकार पाहण्यास मिळतात. यामागे अशा तिकिटांचा 'तत्काळ' काळाबाजार करणारे कार्यरत असल्याचे समोर आले असून, मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने पुणे विभागातील वाठार रेल्वे स्थानकावर दोन व्यक्तींना गुरुवारी रंगेहात पकडले.



पुणे रेल्वे विभागातील सातारा जिल्ह्यात वाठार रेल्वे स्थानक आहे. या ठिकाणी तत्काळ तिकिटाचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती दक्षता पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने गुरुवारी सापळा रचून दोघांना तत्काळ तिकीट काढत असताना पकडले. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर ते बऱ्याच दिवसांपासून अवैध मार्गाने तत्काळ तिकिटे काढून चढ्या दराने विक्री करीत असल्याचे दिसून आले. दक्षता पथकाच्या अधिकाऱ्यांनी आरोपींच्या मोबाइलचा तपास केला असता त्यांच्याकडे ६० हजार रुपये किमतीची सक्रिय असलेली आरक्षित तत्काळ तिकिटे असल्याचे दिसून आले; तसेच काही दिवसांमध्ये त्यांनी एक लाख रुपयांची तिकीट विक्री केल्याचे दिसून आले आहे.

हे आरोपी केवळ आजच्या कारवाईतच नव्हे, तर बऱ्याच काळापासून रेल्वे तिकिटांच्या काळाबाजाराच्या अवैध धंद्यात सक्रियपणे सामील होते. त्यांनी अनेक प्रवाशांना तत्काळ तिकिटे उपलब्ध करून देण्याच्या बहाण्याने आर्थिक फसवणूक केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या आरोपींना रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात देण्यात आले आहे. यामध्ये आणखी कोणाचा सहभाग होता का, रेल्वे प्रशासनातील कोणाचा सहभाग आहे का याचादेखील तपास सुरू आहे.

**कडक कारवाई आवश्यक !**

रेल्वे प्रशासनाने तिकीट बुकिंग प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणे, संशयास्पद आयडींची तपासणी करणे आणि काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. वाठार स्थानकावरील कारवाईमुळे तत्काळ तिकिटांच्या काळाबाजाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून कडक कारवाई होणे आवश्यक आहे.

**प्रवाशांच्या दृष्टिकोनातून प्रश्नचिन्हे**

दक्षता पथकाने केलेली कारवाई महत्त्वाची असली, तरी काही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. तत्काळ तिकिटे सर्वसामान्य प्रवाशांना उपलब्ध का होत नाहीत?, ऑनलाइन बुकिंग प्रणालीतील त्रुटींचा गैरफायदा घेतला जातो का?, एजंटांच्या माध्यमातून 'ब्लॉक बुकिंग' रोखण्यासाठी आणखी कडक यंत्रणा आवश्यक आहे का?, रेल्वे प्रशासनाने स्थानिक स्तरावर नियमित गुप्त तपासणी का केली जात नाही.

तत्काळ तिकीट काढण्याच्या वेळेला वेबसाइट स्लो होणे, काही मिनिटांत तिकिटे संपणे आणि नंतर एजंटांकडे तीच तिकिटे जादा दराने उपलब्ध होणे ही बाब संशयास्पद आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक फटका बसत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. या कारवाईमुळे काही प्रमाणात प्रवाशांना दिलासा मिळाला असला, तरी अशी कारवाई सातत्याने होणे गरजेचे आहे.

# कोटमगाव रेल्वे पुलाचा प्रश्न ऐरणीवर !

## उंची कमी केल्याने बस, ट्रॅक्टर वाहतूक ठप्प!





**अक्षराज : सनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** लासलगाव-पिंपळगाव (ब) मार्गावरील कोटमगाव येथील रेल्वे पुलाला दोन दिवसांपूर्वी ट्रकने दिलेल्या धडकेमुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. रेल्वे प्रशासनाने सुरक्षिततेच्या कारणास्तव पुलाची उंची कमी करण्यासाठी 'हाईट गेज' लावण्याचे काम हाती घेतले असले, तरी यामुळे बस सेवा आणि शेतकऱ्यांची ट्रॅक्टर वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. या पार्श्वभूमीवर डी. के. नाना जगताप यांनी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढण्याची विनंती केली आहे.

**नेमकी अडचण काय?**

ट्रकच्या धडकेमुळे पुलाच्या स्लॅबमधून खडी पडत असल्याने रेल्वे प्रशासनाचे सिंग आणि असिस्टंट इंजिनिअर यादव यांनी तातडीने उपाययोजना म्हणून उंची रोधक बसवण्याचे काम सुरू केले. मात्र, पुलाची उंची कमी झाल्याने...

> ● जोपर्यंत नवीन पुलावरील महावितरणच्या तारांचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत किमान १५-२० दिवस रेल्वे प्रशासनाने सहकार्य करावे आणि पुलाची उंची कमी करू नये. एकदा नवीन पूल सुरू झाला की, रेल्वेने जुन्या पुलाबाबत घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला आमची तक्रार राहणार नाही.
> **- डी. के. नाना जगताप**

**विद्यार्थ्यांचे हाल :** शाळा-महाविद्यालयांच्या परीक्षा सुरू असतानाच बस सेवा बंद झाल्याने विद्यार्थ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

**शेतकऱ्यांचे नुकसान :** लासलगाव बाजार समितीत कांदा घेऊन जाणारे ट्रॅक्टर्स याच मार्गावरून जातात. वाहतूक बंद झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती आहे.

**डी. के. जगताप यांची मध्यस्थी :**

या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी डी. के. जगताप यांनी रेल्वे अधिकाऱ्यांची भेट घेतली. अनेक वर्षांपासूनचा हा सोयीचा मार्ग अचानक बंद केल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. नवीन पूल तयार असूनही महावितरणच्या विद्युत तारांच्या अडथळ्यामुळे तो वापरता येत नाहीये, असे त्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.

**मंत्र्यांकडे पाठपुरावा आणि तात्पुरती विनंती...**

नवीन पुलावरील विद्युत तारा हटवण्यासाठी मंत्री गिरीष महाजन आणि मंत्री छगनराव भुजबळ यांच्या माध्यमातून महावितरणकडे सतत पाठपुरावा सुरू आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी साधारण १५ ते २० दिवसांचा कालावधी लागणार आहे.

सध्याच्या घडीला विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# नॅनो टेक्नॉलॉजीत नव संशोधनास संधी : डॉ. खिलारी

## ढोकेश्वर महाविद्यालयामध्ये नॅनो टेक्नॉलॉजी कार्यशाळा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** विद्यार्थ्यांना नॅनो टेक्नॉलॉजीत नवीन संशोधनास मोठी संधी असून त्यामधून नवनवीन संशोधक निर्माण होतील असे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे कार्यकारिणी सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी मंडळ व श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने न्यू रिसर्च अपॉचर्युनिटी इन नॅनो टेक्नॉलॉजी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज पारनेरचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगला अनुभव व आत्मविश्वास मिळाला तर ते यशस्वी होतात यातून विविध विषयातील सूक्ष्म घटकांचे ज्ञान मिळून संशोधन करायचे याला नॅनो टेक्नॉलॉजी असे म्हटले जाते. नॅनो टेक्नॉलॉजीचा उपयोग औषधे,शेती संरक्षण क्षेत तसेच पर्यावरण यासारख्या विविध क्षेत्रातील नव संशोधनासाठी केला जात आहे. या कार्यशाळेतून आपण आत्मविश्वास घेऊन जावा असे सांगितले.

यावेळी अ. नगर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रदिप शेळके यांनी नॅनो टेक्नॉलॉजी म्हणजे काय याबाबत मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अशोक जाधवर यांनी नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रातील नवनवीन संधी बाबत मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. रमेश भिसे यांनी नॅनो टेक्नॉलॉजीचे महत्त्व, प्रकार, वर्गीकरण, रचना व वापर याचे महत्त्व विशद केले. श्री ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर यांनी नॅनो टेक्नॉलॉजी या विषयात मोठ्या प्रमाणात संशोधन होत असल्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रात काम करण्याच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. संजय गायकवाड हे होते.

या कार्यशाळेसाठी प्रा. पोपट पठारे, प्रा. निलेश पवार व प्रा. रमेश खराडे व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यशाळा यशस्वीतेसाठी प्रा. ताई नऱ्हे, प्रा. पूजा रोडे, प्रा. नामदेव वाल्हेकर, प्रा. शैलेजा टिंगरे, प्रा. रमेश झावरे, प्रा. सोमनाथ चौधरी, प्रा. आरती जगताप यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. विरेंद्र धनशेट्टी व प्रा. संकेत ठाणगे यांनी केले तर प्रा. किशोर कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गुडसूर येथे मध्यरात्री घरफोडी; ३.६६ लाखांचा मुद्देमाल लंपास

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२१, उदगीर (लातुर) :** उदगीर गुडसुर येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून तब्बल ३ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे वाढवणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी राजकुमार रामचंद्र लखनगावे (वय ३२ वर्षे, व्यवसाय शेती, रा. गुडसूर ता. उदगीर जि. लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११.३० ते २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ५.३० या दरम्यान ही घटना घडली. फिर्यादी जेवण करून झोपले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कडी-कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटाचे लॉक तोडून आत ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे ७९ ग्रॅम (७ तोळे ९ ग्रॅम) वजनाचे विविध प्रकारचे सोन्याचे दागिने गंठन, अंगठ्या, झुमके, नेकलेस, लॉकेट यांची अंदाजे किंमत ३ लाख १६ हजार रुपये असून, त्यासोबत ५० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ३ लाख ६६ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. या प्रकरणी (BNS) कलम ३३१ (४), ३०५ (अ) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक ४०/२०२६ दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. पी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

ग्रामीण भागात वाढत असलेल्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सामाजिकता हरवत आहे!

आज सर्व काही आहेपैसा, प्रसिद्धी, मोठी घरे; पण त्या चाळीत राहायचो तो आनंद आज कुठेच दिसत नाही, अशा शब्दांत ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांनी आपल्या चाळ संस्कृतीच्या आठवणींना उजाळा दिला. गडकरी रंगायतन येथे आयोजित 'आनंदोत्सव' कार्यक्रमात बोलताना त्यांनी सांगितले की, छोट्या-छोट्या गोष्टींतून खरा आनंद मिळायचा. चाळीत तब्बल ८० खोल्या होत्या; मात्र कधीच कोणी वेगळे असल्याची भावना निर्माण झाली नाही. आम्ही सगळे एकच कुटुंब आहोत, असंच नेहमी वाटायचं, असे ते भावूक होऊन म्हणाले. जीवनात मोठे परिवर्तन झाल्यानंतरही सामाजिकता हरवत चालल्याची खंत त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट जाणवत होती. ग्रामीण तसेच जुन्या शहरांतील जीवन हे एकमेकांत मिसळून, परस्पर सहकार्याने जगण्याचे होते. 'माझे कुटुंब, माझीच जबाबदारी' इतका संकुचित विचार त्या काळी केला जात नव्हता. आज मात्र काही कुटुंबे त्याही पुढे जाऊन आत्मकेंद्री झाली आहेत. प्रत्येक जण मोबाईलमध्ये डोके खुपसून स्वतःच्या बेडरूममध्येच अडकलेला दिसतो.

पूर्वीआणि आजही ग्रामीण भागातप्रत्येक कुटुंबाची माहिती गावातील प्रमुखांसह अनेकांना असते. अख्खे गाव एक कुटुंब मानून लोक जगत असत आणि आजही अनेक ठिकाणी तसेच जगत आहेत. सण, उत्सव, जत्रा, यात्रा यांमधून लोक एकत्र येतात. लग्नकार्य असो वा मयत प्रसंगसारे गाव एका ठिकाणी लोटले जाते. खाजगीपणा जपला जातो; पण त्याचबरोबर एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ या संतवचनाचाही अवलंब केला जातो. आज खाजगीपणा म्हणजे स्वतःभोवती काटेरी कुंपण घालून जगणे, असे चित्र निर्माण झाले आहे. औद्योगिकीकरणानंतर झपाट्याने शहरीकरण झाले; पण शहरातील चाळ संस्कृतीतही लोक घनिष्ठ संबंध ठेवून जगत होते. चाळी, झोपडपट्ट्या आणि गृहनिर्माण संस्थांमधील लोक विविध समारंभांच्या निमित्ताने एकत्र येत. एखाद्या ठिकाणी शिळोप्याच्या गप्पा रंगत. लोक आपली दुःखे, व्यथा, आनंदाचे क्षण आणि घडामोडी यांवर मोकळेपणाने बोलत असत. खरं तर आजही खेड्यातील आणि शहरातील छोट्या वस्त्यांतील लोक अधिक माणुसकी जपताना दिसतात.मध्यमवर्गीयांच्या आणि उच्चभ्रू लोकांच्या अपार्टमेंट्स व बंगल्यांमध्ये मात्र सामाजिकता हरवत चालली आहे. लोक बंद दरवाज्यांआड 'खाजगीपणा' जपण्याच्या नावाखाली अलिप्त जीवन जगत आहेत. माझीच गाडी, माझीच माडी आणि माझ्याच बायकोची गोल गोल साडी , या वृत्तीमुळे 'मी आणि माझे' यापलीकडे जाण्याची तयारी कमी होत आहे. समाजात मिसळताना होणारे तोटे आणि धोके यांवरच भर देत काहीजण लोकांपासून दूर राहणे पसंत करतात. आर्थिक फसवणूक, नात्यांचा गैरफायदा, पैशांची मागणीया कारणांमुळेही लोक अलिप्त होत आहेत. परिसरातील विक्रेते, सेवा पुरवठादार यांच्याशीही अनेकजण केवळ कामापुरतेच संबंध ठेवतात. सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक विषयांवर चार शब्द बोलायलाही ते तयार नसतात. काही वेळा हा अति-खाजगीपणा अहंकारातूनही निर्माण होतोमीच का बोलावे?, मीच का पुढाकार घ्यावा?या विचारांतून अनेकजण एकलकोंडे होत स्वतःच्या कोशातच आयुष्य घालवतात.

पूर्वी अंत्यसंस्कारासाठी मोठी गर्दी असायची; आज खांदा द्यायलाही चार माणसे मिळणे कठीण झाले आहे. माणसं माणसांपासून दूर जात आहेत. नात्यांची वीण सैल होत आहे; अनेक नाती तकलादू बनत आहेत. आर्थिक वासना, लैंगिक अत्याचार, संवेदनशीलतेचा गैरफायदाया घटनांमुळेही लोक खाजगीपणाकडे अधिक झुकताना दिसतात. शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे 'क्लास संस्कृती' वाढली आहे. बालपणापासून ते महाविद्यालयीन जीवनापर्यंत मुला-मुलींना एकत्र मिसळून राहण्यासाठी वेळच उरत नाही. सहा ते बारा हे वय 'टोळी काळ' म्हणून ओळखले जाते. या वयात सामाजिकता विकसित होत असते. मैदानावरील खेळ, गप्पा, स्वतःची सांकेतिक भाषाया साऱ्यांतून मैत्री आणि सहजीवनाची बीजे रुजत असतात. परंतु सततच्या अभ्यासाच्या आणि स्पर्धेच्या दडपणामुळे मुले अधिक आत्मकेंद्री होत आहेत.

शेवटी, स्पर्धात्मकता, परस्परांबद्दलची संशयकता, स्वार्थी वृत्ती आणि संघभावनेचा अभावया कारणांमुळे लोकांमधील सामाजिकता कमी होत चालली आहे. आज आपल्याकडे सुविधा, साधने आणि संपन्नता आहे; पण मनांतील ऊब हरवत चालली आहे. पुन्हा एकदा माणसांशी माणूस म्हणून जोडले जाणे, संवाद वाढवणे आणि परस्पर सहकार्याची भावना जागवणेहीच काळाची गरज बनली आहे. कारण शेवटी, सुखाचा खरा अर्थ मोठ्या घरात नसून, मोठ्या मनात दडलेला असतो.


**– किशोर जाधव**

# थोर समाजसुधारक व महान विचारवंत संत गाडगेबाबा

डेबूजी झिंगराजी जानोरकर ज्यांना सारे जग संत गाडगेबाबा या नावाने ओळखते ते अशिक्षित होते परंतु त्यांचे समाजकार्य, ज्ञान व विचार संपूर्ण मानव जातीचे कल्याण करणारे होते.संत गाडगे बाबा हे विचारांचे, ज्ञानाचे व शिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ होते. त्यांनी सांसारिक जीवनाचा त्याग केला. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व वाईट चालीरिती बंद करण्यासाठी त्यांनी समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम वापरले. किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील अविचारांची घाण काढून टाकली.शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

थोर समाजसुधारक, महान विचारवंत, सुप्रसिद्ध किर्तनकार राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची आज जयंती. २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेणगाव या गावात त्यांचा जन्म झाला. त्यावेळी गावा गावांत व समाजात अनिष्ट रूढी परंपरा, चालीरिती, अज्ञान, अविचार, अंधश्रद्धा यांचा बोलबाला सुरू होता. लोकांच्या नशिबात नेहमीच दारिद्र्य पेरलेले होते. त्यामुळे वरिष्ठांकडून त्यांचे शोषण व पिळवणूक होत होती. ही गोष्ट गाडगेबाबांच्या बरोबर लक्षात आली. लग्न होऊन संसारात रममाण झालेल्या गाडगेबाबांचे मन नेहमी अस्वस्थ राहायचे. लोकांचे व समाजाचे प्रबोधन करणे फार महत्त्वाचे आहे हे त्यांनी ताडले. त्यांनी वैराग्य पत्करले, डोक्यावर फुटक्या गाडग्याचे खापर ठेवून, एका हातात गोधडी व दुसऱ्या हातात खराटा घेऊन ते गावोगावी हिंडू लागले.

वाटेत येणाऱ्या गावातील घाण व अस्वच्छता खराट्याने दिवसभर स्वच्छ करणारे गाडगेबाबा रात्री देवळात थांबून किर्तन भजन करीत. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला हे त्यांचे भजन लोक आवडीने ऐकायचे. मंदिरात गोळा होऊन किर्तन ऐकायचे. नेमकी हीच संधी साधून गाडगेबाबा लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगायचे. पोटाला भाकर कमी खा पण लेकरांना शिक्षण शिकवा. एकच कापड स्वच्छ धुवून वापरा पण लेकरांना शिक्षण शिकवा असे ते पोटतिडकीने सांगायचे. अस्वच्छ राहू नका, अडाणी राहू नका



हे ही ते आवर्जून सांगायचे.देव देवळात नाही तो माणसांत आहे.कर्ज काढून सण साजरे करू नका. हे सुध्दा ते वारंवार सांगायचे. देव अंगात येणे, भूत लागणे, देवी कोपणे, भानामती, गंडा दोरी हे सगळं थोतांड आहे हे गाडगेबाबा पुन्हा पुन्हा सांगायचे. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी! हे किर्तनाने समजावून सांगताना ते म्हणायचे, देव देवळात नाही. देव गोरगरीब जनतेमध्ये, सज्जन, निर्व्यसनी व स्वच्छ लोकांच्यामध्ये राहतो.म्हणून स्वच्छता राखा, चारित्र्यवान बना, व्यसने करू नका हे सांगताना गाडगेबाबा कधीच थकत नसत. खराट्याने गावातील घाण व किर्तनाने लोकांच्या डोक्यातील घाण स्वच्छ करून किर्तन संपले की गाडगे महाराज दुसऱ्या गावाची वाट धरायचे. समाजप्रबोधनाची ही भटकंती गाडगेबाबांनी जीवनभर प्रभावीपणे केली.अशा प्रकारे प्रभावी समाज प्रबोधन करणाऱ्या गाडगे बाबांनी आपल्या जीवनात नेहमी दिन दलित लोकांची, गोरगरीबांची,कुष्ठरोग्यांची सेवा केली. त्यांनी किर्तनकार या नात्याने लोकांना नेहमी चांगला उपदेश केला. चोरी करू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवाधर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका.सावकाराचे कर्ज काढून सण साजरे करू नका.जातीयता आणि अस्पृश्यता पाळू नका. असे उपदेश करणारे संत गाडगेबाबा खरोखर थोर समाजसुधारक म्हणून शोभतात. त्यांनी शिक्षणाच्या प्रचार व प्रसारासाठी वसतिगृहे बांधली, आश्रमशाळा सुरू केल्या. धर्मशाळा बांधल्या.गरीबांसाठी, अनाथांसाठी व अपंगांसाठी त्यांनी अन्नछत्रालये सुरू केले.

डॉ.पंजाबराव देशमुख व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यात गाडगेबाबांनी तोलामोलाची साथ दिली. त्याच बरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजकार्याला व शैक्षणिक कार्याला पाठिंबा देणारे संत गाडगेबाबा जी जी मदत करता येईल ती मदत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सढळ हाताने मदत करतात. राष्ट्रसंत म्हणून अद्वितीय समाज कार्य करणारे थोर समाजसुधारक गाडगेबाबा प्रमुख समाजसुधारकांच्या यादीत गणले जातात.त्यांचे समाजप्रबोधनाचे कार्य हे खरोखर मानवतावादी, प्रशंसनीय, उल्लेखनीय तसेच दिन दलितांच्या, अनाथांच्या व अपंगांच्या हिताचे होते. अशा या थोर समाजसुधारकाला व महान विचारवंताला जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**त्यांच्या समाजकार्याला कोटी कोटी वंदन!**

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर**
**जि.लातूर. मो.९५४५४४२६४८**


# शिक्षणातील प्रामाणिकपणा आणि नवोन्मेष : काळाची गरज

मी इयत्ता सातवीत असताना विज्ञान प्रदर्शनात भाग घेतला होता. त्या प्रदर्शनासाठी मी 'अंधश्रद्धा' हा विषय निवडला होता आणि त्या अनुषंगाने दोन प्रयोग सादर केले होते. अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, हा माझ्या उपक्रमांचा उद्देश होता.

बुवाबाजी करणारे जसे लिंबूतून रक्त किंवा ज्वाला काढल्याचा आभास निर्माण करतात, तसेच प्रयोग मी करून दाखवत होतो. लिंबू कापताना चाकूला मिथिल ऑरेंजचे द्रावण लावत होतो; त्यामुळे लिंबातून रक्त निघाल्याचा भास होत होता. तसेच, चाकूला फॉस्फरस लावल्यावर त्यातून ठिणग्या व ज्वाला बाहेर पडत. सादरीकरणानंतर मी पाहणाऱ्यांना यामागील शास्त्रीय कारणे स्पष्ट करत होतो. त्यामुळे अंधश्रद्धेपेक्षा विज्ञानाची ताकद लोकांना समजत होती.

माझ्या शेजारी एक विद्यार्थी गतीऊर्जेचे विद्युत ऊर्जेत रूपांतर या संकल्पनेवर आधारित उपकरण घेऊन बसला होता. तो हाताने एक चक्र फिरवत असे आणि त्याच वेळी शेजारी ठेवलेला बल्ब पेटत असे. मात्र, त्याने त्यात एक चलाखी केली होती, जी परीक्षकांनी ओळखली. त्याने पायाजवळ एक बटन ठेवले होते आणि ते दाबल्यावरच बल्ब लागत होता. हाताने फिरवलेल्या चक्राचा आणि पेटणाऱ्या बल्बचा प्रत्यक्षात काहीही संबंध नव्हता. अशा प्रकारे विज्ञान प्रदर्शनात फसवणूक करून बक्षीस जिंकण्याचा त्याचा प्रयत्न होता; परंतु सुज्ञ परीक्षकांनी त्याला प्रदर्शनातून बाहेर काढले.

अशीच काहीशी घटना मागील आठवड्यात दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय एआय परिषदेत घडली. गलगोटिया युनिव्हर्सिटी या विद्यापीठाने आपल्या स्टॉलमध्ये सादर केलेला रोबोटिक डॉग हा त्यांच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये विकसित केल्याचा दावा केला होता. मात्र,



तो प्रत्यक्षात Unitree Go2 नावाचा रोबोट असून तो Unitree Robotics या चिनी कंपनीने बनवलेला आहे, हे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. व्हिडिओ व्हायरल होताच या प्रकाराने खळबळ उडाली. वाद वाढल्यानंतर विद्यापीठाने सुरुवातीला आपण असा दावा केलाच नव्हता, अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला; मात्र आयोजकांनी त्यांना स्टॉल काढून घेण्यास सांगितले. परिणामी, विद्यापीठाची नाचक्की झाली.

नवसंशोधन आणि नवोन्मेष या गोष्टी आजच्या शिक्षणात अत्यंत आवश्यक आहेत. परंतु केजीपासून पीएचडीपर्यंतचे शिक्षण अनेकदा 'कॉपी-पेस्ट' संस्कृतीकडे झुकताना दिसते. उत्तीर्णतेची केवळ कागदी पदवी मिळवण्याची चढाओढ लागली आहे. जे थोडेफार संशोधन आणि नवोन्मेष करून स्वतःची प्रतिभा उंचावण्याचा प्रयत्न करतात, त्यांना भारतात अपेक्षित संधी न मिळाल्याने परदेशात स्थायिक व्हावे लागते. सुंदर पिचाई, सत्या नाडेला,अरविंद कृष्णा, शंतनू नारायण यांसारख्या अनेक भारतीयांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी कामगिरी बजावली आहे. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेला तेथे योग्य वाव मिळाला.

शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे अशा प्रकारांना खतपाणी मिळत आहे. अनेक शिक्षणसंस्था पैसा कमावण्याचे साधन बनत आहेत. पूर्वी विद्यार्थ्यांची कसून परीक्षा घेतली जात असे. विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून तयारी करत असत. आज मात्र तोंडी गुण, बनावट प्रात्यक्षिके आणि कॉपी-पेस्ट प्रकल्पांच्या आधारे अतिरिक्त गुण देऊन विद्यार्थ्यांना पुढे ढकलले जाते. त्यांनी सादर केलेली प्रात्यक्षिके खरी की खोटी, हे तपासण्यासाठी सक्षम यंत्रणा असणे अत्यावश्यक आहे. विशेषतः पीएचडीसाठी सादर होणारे प्रबंध मनन, चिंतन, वाचन, सर्जनशीलता आणि प्रत्यक्ष प्रयोगांवर आधारित आहेत का, याची काटेकोर पडताळणी झाली पाहिजे.

प्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, नवविचार आणि प्रयोगशीलता जोपासली पाहिजे. क्षेत्रभेटींना प्राधान्य दिले पाहिजे. शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडला गेला पाहिजे. केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता पुस्तकाबाहेरील ज्ञान आत्मसात करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. पर्यावरण संरक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, प्रौढ साक्षरता, प्रदूषण नियंत्रण, व्यसनमुक्ती, तंटामुक्त गाव, स्वच्छ सुंदर गाव, नैसर्गिक शेती अशा सामाजिक उपक्रमांशी विद्यार्थ्यांना जोडले पाहिजे. विविध विचारप्रणालींची ओळख करून देत वाचन-लेखनाची गोडी विद्यार्थीदशेतच लावली पाहिजे.

शिक्षण हे व्यक्तीच्या वैचारिक, सामाजिक, आर्थिक, नैतिक आणि राजकीय परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार, शिक्षणातून येणारे शहाणपण समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी वापरले गेले पाहिजे. ते म्हणतात की, लोकांना फसवण्यासाठीही बुद्धी आणि चातुर्य लागते. दुर्दैवाने, हीच बुद्धी काहीजण चुकीच्या मार्गाने वापरतात. त्यामुळे शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता नैतिकतेची जाणीव निर्माण करणारे असले पाहिजे.

शेवटी, अधिक पैसा कमावणे हा शिक्षणाचा अंतिम उद्देश नसावा. मानवी जीवन अधिक सजग, सुसंस्कृत आणि सुखी व्हावेहा शिक्षण व्यवस्थेचा मूलभूत हेतू असला पाहिजे. प्रामाणिकपणा, संशोधननिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारलेले शिक्षणच खऱ्या अर्थाने राष्ट्राला सक्षम बनवू शकते.

**– किशोर जाधव,**
**सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

## व्यवस्थित

असो विषय कुठला
शंका करे उपस्थित
मांडणी रे आकर्षक
पटवून दे व्यवस्थित

असेचं घडले म्हणां
भले असूदे अस्थित
पीपी टी प्रेझेंटेशनने
मुद्दे मांडावे शिस्तीत

प्रत्यक्ष दर्शी कुणीही
नसे ना हो अवस्थित
उभ्या भ्रामकप्रतिमा
रे संभ्रमाच्या वस्तीत

गाजत ठेवावे सवाल
मन शंकासुर उत्थित
ख–या वाटू लागतात
भोंगळ गोष्टी कथित

जनता भावनाविवश
आधीच असे व्यथित
चटकन् ठेवी विश्वास
काहीही सांग ग्रथित

भविष्य कार टपलेले
करे विस्मयी भाकित
चमत्कार प्रिय सर्वांस
आवडे होण्या चकित

सत्य म्हणूं वावरतात
गोष्टी कपोलकल्पित
हळूच साधून घ्यायचे
कार्य भाग संकल्पित

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शिवभक्त मंडळ आडे आयोजित शिवजन्मोत्सव साजरा



**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**
**दि.२१, दापोली (रत्नागिरी) :** दापोली तालुक्यातील, आडे गावी गेल्या सहा वर्ष्यापासून शिवजयंती उत्सव तरुण पिढीने सुरू केला असून, दरवर्षी हा उत्सव खुप मोठया उत्साहात साजरा करण्यात येतो. या वर्षी ही असाच उत्सव साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे येथे महाप्रसाद असतो.

सकाळी १० वाजता शिवरायांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. दुपारी, १२ वाजता. विधिवत पूजा करून आरती करण्यात आली. नंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत समारंभ, शालेय विद्यार्थ्यांचे. भाषण झाले. दुपारी ३ वाजता भव्य दिव्य, मिरवणूक काढण्यात आली. या प्रसंगी शिवभक्त मंडळ आडे. अध्यक्ष सोहम परकर, उपाध्यक्ष पार्थ मुरडकर, सेक्रेटरी सुरज खोत, रोहित खातू, खजिनदार अमित मुरडकर, विशेष सहकार्य श्री राम मंडळ, श्री राम महिला मंडळ, आडे यांचे लाभले.

## मोक्का गुन्हातील आरोपी आखिर जेरबंद !

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**
**दि.२२, येरवडा (पुणे) :** (लक्ष्मीनगर) पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने उल्लेखनीय कामगिरी करत सहा महिन्यांपासून फरार असलेल्या मोक्का गुन्ह्यातील आरोपीला अखेर जेरबंद केले आहे. आरोपीचे नाव मयुर उर्फ मयऱ्या मोतीराम राठोड (वय २६) असे असून हवेली तालुक्यात ही कारवाई पार पडली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग सुरू असताना पोलीस अंमलदार राहुल परदेशी व अक्षय शिंदे यांना गोपनीय माहिती मिळाली की, मयुर उर्फ मयऱ्या मोतीराम राठोड हा येरवडा परिसरातील डेक्कन कॉलेज दर्गा जवळ थांबलेला आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचून घटनास्थळी धाड टाकली.

संशयित इसमाला ताब्यात घेतल्यानंतर चौकशी केली असता तो मागील सहा म हिन्यांपासून फरार असलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने ही कारवाई करत कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही.

या कारवाईमुळे परिसरात कायद्याचा धाक पुन्हा निर्माण झाला असून नागरिकांकडून लक्ष्मीनगर पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक केले जात आहे.

## नवी मुंबई आरटीओ कार्यालय शिवजयंती साजरी



**अक्षराज : गणेश जाधव**
**दि.२१, नेरूळ (नवी मुंबई) :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती नवी मुंबई आरटीओ कार्यालय अधिकारी, कर्मचारी व वाहन चालक मालक प्रतिनिधी संघटना यांनी मोठ्या उत्साहात व आनंदात शिवजयंती साजरी केली.

यावेळी शिव छत्रपतींच्या प्रतिमेस व मुर्तीस गुलाबाच्या फुलांचा हार घालून व फुले वाहून अभिवादन करण्यात आले. या उत्सवाप्रसंगी सहा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष दरगोडे, आरटी इन्स्पेक्टर भगूरे, ठाकरे मॅडम, आरटीओ कर्मचारी श्री कानगूडे, जाधव, तेली, राजपूत, वाहन चालक मालक प्रतिनिधी संघटना अध्यक्ष, प्रमोद तनपूरे, उपाध्यक्ष गणेश कांबळे, प्रदीप भोसले, राजेश भोईर, निलेश कचरे, अमरदीप सिंग, भाऊसाहेब दांगट, धनंजय पाटील, युवराज पाटील, सचिन लकडे यांच्यासह अनेक शिवभक्त उपस्थित राहून हा शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा केला.

या प्रसंगी गणेश कांबळे यांच्या शिवगर्जना व छत्रपतींच्या जय जय काराने नवी मुंबई आरटीओ कार्यालय परिसर पुर्णपणे शिवमय असा झाला.

## प्रा.वर्षा गाढवे एम.बी.ए.पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



**अक्षराज : बाळू धायगुडे**
**दि.२१, खंडाळा (सातारा) :** खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे म हाविद्यालयाच्या बीसीए विभागप्रमुख यांनी नुकतीच भारती विद्यापीठ, पुणे(अभिमत विद्यापीठ) येथून एम.बी.ए. पदवी प्रथम श्रेणीने प्राप्त केली आहे. प्रा.वर्षा गाढवे यांचे संगणक शास्त्रातून पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण केले.

त्यांनतर जवळपास ०५ वर्ष माहिती तंत्रज्ञान व मानव संसाधन क्षेत्रात आपल्या कार्याची छाप उमटवली असून गत ०७ वर्षांपासून सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयात बी.सी.ए. विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. प्रा.गाढवे यांनी अध्यापनासोबत सातत्याने विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण संकल्पना रुजविण्यासाठी प्रयत्नशील असून त्यांच्या मार्गदर्शनाने अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी विविध नामांकित कंपनी व संस्थेत कार्यरत आहेत. प्रा.वर्षा गाढवे खंडाळा नगरपंचायतीचे गटनेते योगेश गाढवे यांच्या सुविद्य पत्नी असून राजकारणासोबत सामाजिक कार्यात त्यांनी आपली वेगळी छाप उमटवली आहे. प्रा.गाढवे यांनी कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक जबाबदारी सांभाळत एम.बी.ए. चे शिक्षण प्रथम श्रेणीतून पूर्ण केले.

यशाबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून खंडाळा विभाग शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव गाढवे, सचिव संजीव गाढवे, सर्व संचालक, सदस्य, यांसोबत प्राचार्य डॉ.हणमंत जाधव, कार्यालयीन अधीक्षक संतोष गाढवे आणि सर्व कर्मचारी वृंद, राजेंद्र विद्यालयाचे प्राचार्य तुळशीराम खांडे, ग्रंथपाल हणमंत यादव, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, सुशिला मोहिते पर्यवेक्षिका योगिता गाढवे, मराठी प्राध्यापिका डॉ.प्रतिभा पाटणे, प्रा.प्रियांका सूळ, प्रा. रुपाली बनसोडे, राज्यशास्त्र तथा कौशल्य विकास विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार, प्रा.सविता सुतार, यासोबत सर्व सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अभिनंदन केले आहे.

## सार्वजनिक मुतारीचा अभाव; बँका, पोस्ट ऑफिससह शासकीय कार्यालयातील नागरिकांची गैरसोय

**अक्षराज : प्रमोद डफळ**
**दि.२२, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द गावात सार्वजनिक मुतारीची कोणतीही सोय नसल्यामुळे व्यापारी, दुकानदार तसेच विविध शासकीय कार्यालयांत कामासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. गावात बँका, पोस्ट ऑफिस, ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय आदी महत्त्वाची कार्यालये असून दररोज मोठ्या संख्येने नागरिक येथे विविध कामांसाठी ये-जा करतात. मात्र मूलभूत स्वरूपाची मुतारीची सुविधा नसल्याने सर्वांनाच अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राहुरी खुर्द येथील मुख्य रस्त्यावर दुकाने, औषधालये, हार्डवेअर व इतर व्यावसायिकांची मोठी वर्दळ असते. त्याचबरोबर शासकीय कामकाजासाठी नागरिकांना बँका, पोस्ट ऑफिस, ग्राम पंचायत व तलाठी कार्यालयात तासन्तास थांबावे लागते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग व्यक्तींना मुतारीची सोय नसल्याने अत्यंत त्रास सहन करावा लागत असल्याची भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

महिलांसाठी ही समस्या अधिक गंभीर ठरत असून सुरक्षित आणि स्वच्छ मुतारी नसल्याने त्यांना लाजिरवाणी परिस्थितीचा सामना करावा लागतो. काही वेळा नागरिकांना उघड्यावर जाण्याची वेळ येत असल्याने परिसरातील स्वच्छतेवर विपरीत परिणाम होत आहे. यामुळे दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे.

स्थानिक व्यापारी व ग्रामस्थांनी सांगितले की, गावाची वाढती लोकसंख्या, व्यापारी उलाढाल आणि शासकीय कार्यालयांची संख्या लक्षात घेता सार्वजनिक मुतारी उभारणे अत्यंत गरजेचे आहे. शासन स्वच्छतेबाबत विविध योजना




राबवत असताना राहुरी खुर्द सारख्या म हत्त्वाच्या गावात ही मूलभूत सुविधा नसणे ही दुर्दैवी बाब असल्याचे मत व्यक्त होत आहे. ग्रामपंचायतीने गावच्या मध्यवर्ती ठिकाणी तसेच शासकीय कार्यालयांच्या परिसरात पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक स्वच्छतागृह उभारावे, नियमित साफसफाई व पाणीपुरवठ्याची कायम स्वरूपी व्यवस्था करावी, अशी ठाम म ागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला आहे.

राहुरी खुर्द मधील या गंभीर सम स्येकडे संबंधित विभाग व स्थानिक प्रशासनाने त्वरित लक्ष देणे आवश्यक असल्याची सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

## निवकणे श्रीजानाईदेवी भेटीला.. जेजुरी मार्तंड पदयात्रा पालखी सोहळा मार्गस्थ

**अक्षराज : सुरेश संकपाळ**
**दि.२१, पाटण :** फुलांनी सजवलेला आकर्षक रथ, खांद्यावर पालखी घेऊन निघालेले मानकरी त्यातच आई श्रीजानाईचा उदो उदो, सदानंदाचा येळकोट गजर करीत तीर्थक्षेत्र जेजुरी तील ग्रामस्थांचा जनसमुदाय दि. १८ फेब्रुवारी बुधवारी आपल्या श्रीजानाईदेवी पायी पदयात्रा सोहळ्याने तिर्थक्षेत्र निवकणे ता. पाटण कडे मार्गस्थ झाला. मंगळवार दि.२४ फेब्रुवारी पासून बुधवार, गुरवार असा तीन दिवस तिर्थक्षेत्र. निवकणे श्रीजानाई देवीची यात्रा मोठ्या भक्ती भावाने साजरी होत आहे.

हा पायी पदयात्रा सोहळा जेजुरी गावाच्या सिमे लगत दौडज खिंडीत बुधवारी दि.१८ फेब्रुवारीला मार्गस्थ करण्यात आला. रुबाबदार बैलजोडी रथाला पारंपरिक लोकवाद्य साथीला तर भक्तांचा लोकगजर यामुळे ग्रामस्थांनी आणि पायी यात्रा करणाऱ्या भाविकानी सर्व परिसर गजबजून गेला होता. गुलाल भंडाऱ्याची उधळण करीत बैलगाड्यांचा ताफा नागमोडी वाटेने निघाला. दीडशे किलोमीटर दूर असलेल्या पाटण तालुक्यातील निवकणे श्रीजानाईदेवीच्या यात्रेला पारंपरिक संत नागूमाळी यानी शेकडो वर्षापासून सुरु केलेली हा पायी पालखी सोहळा त्यांचे वंशज नागनाथ झगडे आणि त्यांचा परिवार आजही चालवत आहे.



श्रीजानाईदेवी पदयात्रा मंडळाच्या माध्यमातून गेली कित्येक वर्ष हजारो पायी जाणाऱ्या भाविकांनी आणि समस्त ग्रामस्थांना आजही मोफत अन्नदान जलपान व्यवस्था अखंड ठेवत आहे. जेजुरी येथिल अनेक उद्योजक कारखानदार व्यापारी तसेच मानकरी गावकरी देवसंस्थान बारा बलुतेदार संघ आपला सेवाभावी हातभार लावत आहेत यामुळे सर्व अठरा पगड जाती धर्मातील ग्रामस्थ मोठ्या भक्त भावने यात सामील होताना दिसत आहेत. जेजुरीकर ग्रामस्थांच्या वतीने सम ुद्रसपाटीपासून सुमारे १३०० मीटर उंच असलेल्या मणदुरे येथे काऊदऱ्यावर श्रीजानाईदेवीला वसुंधरा मानून मंगळवारी सकाळी ८.३० वा. भक्ती भावाने या पालखी सोहळ्यातील भक्त निसर्गपुजा करतात.

यावेळी वनउत्सवाच्या निमित्ताने बियांची उधळण, वृक्षारोपण तसेच स्थानिक डोंगरवासी महिलांना ओटी भरून साडी-नारळ देण्याची परंपरा जपली जाते. या कार्यक्रमास पाटणकर, जेजुरीकर, वनविभागाचे अधिकारी आणि विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहतात. त्यामुळे या यात्रेला वनमहोत्सवाचे स्वरूपही प्राप्त झाले आहे. पूर्वपरंपरेप्रमाणे बैलगाड्यांनी प्रवास करण्याची पद्धत आजही दिमाखात सुरू आहे. यंदाही अनेक भाविक बैलगाड्यांसह यात्रेत सहभागी झाले आहेत. आईचा उदो उदो आणि मल्हारी सदानंदाचा येळकोट या जयघोषात पालखीचे प्रस्थान निवकणेकडे झाले आहे.

## देवखेळ वेबसिरीजच्या निषेधार्थ न.लो.संस्थेने घेतली मोठी भूमिका

**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.२२, गुहागर :** अलीकडे झी ५ ओटीटीवर प्रदर्शित झालेली देवखेळ या वेबसेरिजमध्ये कोकणात प्रामुख्याने गुहागर तालुक्यात जोपासलेली लोकसंस्कृती आणि धार्मिकतेशी नाळ जोडलेल्या पारंपरिक संकासुराच्या प्रतिमेबाबत बदनामीकारक व धार्मिक भावना दुखावणारे चित्रण करण्यात आल्याने गुहागर तालुका सह संपूर्ण कोकणातील भाविकांच्या भावना तीव्रपणे दुखावल्या गेल्या आहेत.

शिमगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन नमन लोककला संस्था संलग्न:गुहागर तालुका शाखेच्या वतीने झी ५ ओटीटीवर प्रसारित झालेली देवखेळ या वेबसिरीजवर तातडीने बंदी आणावी त्याचबरोबर संबंधितांवर योग्य ती कारवाई होण्याबाबत प्रशासन तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर न. लो. संस्था तालुका गुहागर शाखेच्या वतीने परिपत्रकाद्वारे गुहागर तालुक्यातील सर्व नमन मंडळ, देवखेळे




यांना महत्वपूर्ण आवाहन करण्यात आले की, सदर गंभीर विषयावर मोजके यूट्यूबर व कंटेंट क्रिएटर्स वगळता इतरांनी कोणताही निषेध नोंदवलेला नाही, ही खेदजनक बाब आहे. म्हणूनच सर्व यूट्यूबर, रिल्स स्टार व कंटेंट क्रिएटर्स यांना येत्या वर्षीच्या शिमगा उत्सवादरम्यान

गुहागर तालुक्यात होणाऱ्या शिमगोत्सवात गाव आणि ग्रामदैवतांच्या श्रद्धा परंपरेनुसार गावभोवनीसाठी चतुर्थ सीमेबाहेर पडणारे देवखेळी त्याचबरोबर होळी शिमगोत्सवातील पालखी सोहळ्यात कोणत्याही प्रकारच्या व्हिडियोग्राफी व फोटोग्राफीवर निषेध म्हणून मनाई करण्यात यावे तसेच संधीसाधू वृत्तीने धार्मिक परंपरांचा गैरवापर करणाऱ्या क्रिएटर्सचां जाहीर निषेध नोंदवून शिम गोत्सवाच्या दरम्यान पारंपरिक वेशभूषेत जे देवखेळे, संकासुर, नटवा, गावभोवनीसाठी गाव-वाडीवस्तीवर जातील त्यांनी आपल्या धार्मिक परंपरेचा सन्मान राखण्यासाठी व्हिडिओ व फोटो चित्रीकरणास ठाम विरोध दर्शवून आपल्या परंपरा, श्रद्धा व लोकसंस्कृतीचा सन्मान राखावा असे परिपत्रकात म्हटले आहे. गेले महिनाभर देवखेळ या वेबसिरीजचा विविध स्तरातून निषेध नोंदवला जात असून देखील सदर वेबसिरीजचे प्रसारण सुरूच असल्याने ऐन शिमगोत्सवात गुहागर तालुक्यात सर्वत्र निषेधाचं सावट पसरले आहे. देवखेळ वेबसिरीजवर तातडीने बंदी आणण्याबाबत स्थानिक प्रशासन,लोकप्रतिनिधी आणि राज्य सरकारने आता गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

## भानेगाव बौद्ध विहारात छ.शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.२२, नागपूर :** भानेगाव येथील भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ, यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहार येथे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरवात कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व सत्कार मूर्ती खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष व जिल्हा भाजप मंत्री दिलीप बनसोड यांच्याहस्ते तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राला माल्यार्पण, महाराष्ट्र गीत व सामुहिक बुद्ध वंदना घेवून करण्यात आली. दिलीप बनसोड यांनी आपल्या उद्बोधनात प्रतिपादित केले की छत्रपती शिवाजी म



हाराजांचे धोरण सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता व समानतेचे होते यातून सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी रयतेला न्यायसंगत वागणूक दिली त्याचीच आज नितांत आवश्यकता आहे. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना व कार्यक्रम अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांकडे उच्च कोटीची नैतिकता, दृढ निश्चय, दूरदृष्टी होती यातूनच प्राजहितकारी राजाने स्वराज्याची घडी बसवून कल्याणकारी राज्याची स्थापना केली. प्रजेचा सन्मान व सामाजिक सुरक्षितेची सांगड न्यायाशी घातली याच विचारांची उजळणी होणे आजही अभिप्रेत आहे असे मत मांडले. यावेळी मिना नरेश ढोके यांनी गीताच्या माध्यमातून छत्रपतींना अभिवादन केले. तर अवेरा, स्वराली, तनिष्का, दिव्या यांनी सामूहिक नृत्य सादर केले. याप्रसंगी धम्मपिठावर उपाध्यक्ष अनिल लांजेवार, कोषाध्यक्ष रविंद्र ढोके, हिशोब तपासणीस नरेश डोंगरे, ओमप्रकाश गौरकर आणि कार्यक्रमात मनोहर गजभिये, भैय्याजी सोनटक्के, किशोर चव्हाण, अरुण नारनवरे आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या कांता बागडे, कुसुम गौरकर, अंजना मेश्राम, प्रभा लोखंडे, सत्यभामा वसनिक, रेखा लांजेवार, पंचशीला डोंगरे, सुनंदा लांजेवार, कल्पना वासनिक, प्रिती गोलाईत, विशाखा ढोके सहित गावातील नागरिक व बालबालिका उपस्थित होते. प्रास्ताविक मालवी नारनवरे, संचालन रोहिणी धनवटे तर आभार सारिका तागडे यांनी मानले.

# जगभरातून येणाऱ्या भाविकांसाठी तुळजापुरात आता 'व्हीव्हीआयपी' विश्रामगृह

## तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा : आमदार पाटील

**अक्षराज : विश्वास नायगांवकर**

**दि.२२, तुळजापूर (धाराशिव) :** आपल्या तुळजापूरचा कायापालट होत आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामाची ४३८ कोटी रुपयांची निविदाही प्रसिद्ध झाली आहे. तीर्थक्षेत्र तुळजापुरात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. पुढील काळात जगभरातील पर्यटक, अभ्यासक आणि भाविकांची तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी मोठी गर्दी अपेक्षित आहे. जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून तुळजापूरचा लौकिक जगभरात वाढणार आहे. या लौकिकाला साजेसे भव्य आणि 'व्हीव्हीआयपी' विश्रामगृहाला उच्चस्तरीय समितीने मंजुरी दिली आहे. त्यासाठी १६ कोटी ३५ लाख रुपयांची मान्यताही मिळाली आहे. लवकरच ३४ हजार चौरस फुटांचे भव्य आणि आधुनिक व्हीव्हीआयपी विश्रामगृह तुळजापुरात उभारले जाणार आहे. सध्या अस्तित्वात असलेले विश्रामगृह ५९ वर्ष जुने असल्यामुळे प्रशस्त आणि आधुनिक इमारतीची गरज होती, त्यासाठी आपण केलेल्या पाठपुराव्याला यश आले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.




तुळजापूर हे साडेतीन शक्तीपीठांपैकी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. त्यामुळे येथे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातून मोठ्या प्रमाणावर भाविक व व्हीआयपी मान्यवर दर्शनासाठी येतात. सध्या अस्तित्वात असलेले विश्रामगृह १९६७ साली बांधलेले आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत ते अपुरे पडत आहे. त्याचबरोबर विश्रामगृहाची इमारत जुनी झाली आहे. भाविकांचा वाढता ओघ पाहता एका प्रशस्त आणि आधुनिक इमारतीची आवश्यकता असल्याने आपण त्यादृष्टीने प्रयत्न केले आणि नवीन विश्रामगृहाच्या बांधकामाला आता उच्च स्तरीय समितने मंजुरी दिली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. त्यामुळे देशभरातून येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या (ततखझ) भाविकांच्या निवासाचा प्रश्न आता कायमचा सुटणार आहे. तुळजापूर येथील शासकीय विश्रामगृहाच्या आवारात सर्व सोयीसुविधांनी युक्त अशा भव्य 'VVIP शासकीय विश्रामगृह' इमारतीच्या बांधकामासाठी १६ कोटी ३५ लाख रुपयांची मंजुरी मिळाली असून, लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. ज्या ठिकाणी ही नवीन वास्तू उभी राहणार आहे, त्या ठिकाणी सध्या तीन जुन्या आणि जीर्ण झालेल्या इमारती आहेत. या इमारती सध्या वापराविना पडून असून, नवीन प्रकल्पासाठी त्या पाडण्यात येणार आहेत. ही जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची (सिटी सर्व्हे क्र. ९०२) असून एकूण क्षेत्रफळ १,१८,९२० चौ.फूट इतके विशाल आहे. सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत हे बांधकाम पूर्ण केले जाणार आहे.

### असे असेल नवीन व्हीव्हीआयपी विश्रामगृह

प्रस्तावित विश्रामगृहाची इमारत ही 'जी प्लस टू' अर्थात तळमजला अधिक दोन मजले अशा स्वरूपाची असून ती पूर्णपणे आरसीसी फ्रेम स्ट्रक्चरमध्ये असेल. या इमारतीचे एकूण जोते क्षेत्रफळ ३,१६८ चौ.मी. (३४,१०० चौ.फूट) इतके भव्य आहे.

विशेष म्हणजे, वास्तुशास्त्रज्ञांकडून या इमारतीचे नकाशे तयार करण्यात आले असून त्याला उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञांची तत्वतः मान्यताही मिळाली आहे. त्यानुसार तळमजल्यावर ४ व्ही.आय.पी. सूट, मीटिंग हॉल, डायनिंग, किचन, चालक रूम तर पहिल्या मजल्यावर २ व्ही.व्ही.आय.पी. सूट, २ सेमी व्ही.आय.पी. सूट आणि दुसऱ्या मजल्यावर २ व्ही.व्ही.आय.पी. सूट, २ सेमी व्ही.आय.पी. सूटच्या बांधकामास मंजुरी मिळाली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

# थोडक्यात

## सुपा एमआयडीसीमध्ये गौण खनिजाचे उत्खनन; कामगार नेते रासकरांचा आरोप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** सुपा एमआयडीसी परिसरात शासनाचा महसूल बुडवून गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्या डम्पर, वाहने व संबंधित कंपन्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी रवीश रासकर यांनी प्रशासनाकडे केली आहे. कंपन्यांनी परवानगी व रॉयल्टी न घेता ब्लास्टिंग व माती उत्खनन सुरू असल्यास संबंधित कंपनी सील करावी, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

सुपा एमआयडीसी मधील युनिपेक पॅकेजिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीबाबत एक महिन्यापूर्वी तहसीलदार व गौण खनिज अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याचा आरोप रासकर यांनी केला आहे. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन उत्खनन व ब्लास्टिंगसाठी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत का, ब्लास्टींगसाठी वापरण्यात आलेल्या ट्रॅक्टर व अन्य यंत्रसामग्रीचे परवाने तपासून पंचनामा करावा व दोषी आढळल्यास दंडात्मक कारवाई करावी. सुपा एमआयडीसीच्या दोन्ही औद्योगिक परिसरात दिवस रात्र माती व मुरुमाचे उत्खनन आणि ब्लास्टींग सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. प्रशासनाने आठ दिवसांत कारवाई न केल्यास तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कार्यकर्त्यांसह बेमुदत उपोषण करण्याचा इशारा कामगार नेते रवीश रासकर यांनी दिला आहे. होणाऱ्या परिणामांस प्रशासन जबाबदार राहील, असे निवेदनात म्हटले आहे. याबाबत नायब तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देताना रविश रासकर, आरपीआयचे किरण सोनवणे, आदिवासी विकास आघाडीचे पुणे जिल्हाध्यक्ष विकास पवार आदी उपस्थित होते.

## अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचे आजपासून उपोषण




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** जिल्हा परिषद स्तरावरील विविध प्रलंबित मागण्या आणि गंभीर स्वरूपाच्या तक्रारींच्या अनुषंगाने अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना निवेदन देण्यात आले. संबंधित प्रकरणांवर वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कारवाई न झाल्याने समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे व पारनेर तालुकाध्यक्ष निवृत्ती कासोटे यांनी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ पासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.

समितीने दिलेल्या निवेदनात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील रस्ते कामांमधील अनियमितता, ग्रामपंचायत स्तरावरील भ्रष्टाचार, बदली प्रक्रियेत नियमभंग, रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहार तसेच अधिकाऱ्यांविरोधातील प्रलंबित चौकशा अशा अनेक मुद्द्यांचा समावेश आहे. पारनेर तालुक्यातील मौजे ढवळपुरी येथील शिवपानंद रस्त्यासाठी मंजूर अंदाजपत्रकानुसार खर्च न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच बोगस मंजूर विहिरी व रस्त्याच्या कामांमध्ये रोजगार सेवक, सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्या संगनमताने बिले काढण्यात आल्याची तक्रार असूनही चौकशी व कारवाई झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केले सर्व प्रकरणांमध्ये पंचायत समितीकडे पत्रव्यवहार न पाठवता जिल्हा परिषद स्तरावरून थेट चौकशी करून तात्काळ पुढील कारवाई करण्यात यावी व चौकशी अहवालासह टिप्पणीच्या प्रती उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी समितीने केली आहे.

# डॉक्टर ते स्पेशालिस्ट - यशाचा नवा अध्याय : आ. काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील गोरेगाव येथील डॉ.अतुल व डॉ. शिल्पा नरसाळे यांचे चिरंजीव डॉ. आशुतोष नरसाळे यांची गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, सोलापूर येथून एमबीबीएस पदवी संपादन केल्यानंतर नागपूर येथील एन.पी.के. साळवे मेडिकल कॉलेजमध्ये एमडी (सायकेट्री) अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी नरसाळे कुटुंबाला भेट देऊन डॉ. आशुतोष यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी सुमन दाते, मा. जि.प. सदस्य वसंतराव चेडे, विश्वनाथ चौधरी, सोनाबाई चौधरी, संगिता चेडे, विजय पिंपरकर, वैशाली पिंपरकर, शहाजी बेलोटे, नंदिनी बेलोटे, आप्पा अडसूळ, वैजयंती अडसूळ, डॉ. शरद ढुमे, डॉ. शाम बेलोटे, राजू चव्हाण उपस्थित होते.

आमदार दाते यांनी यावेळी बोलताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात यश संपादन करणे ही संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब आहे. वैद्यकीय क्षेत्रासारख्या जबाबदारीच्या क्षेत्रात प्राविण्य मिळवून समाजसेवेची वाट निवडणे हे अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षणाच्या बळावरच समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी डॉ. आशुतोष यांना रुग्णसेवेच्या कार्यात संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला.

सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वसामान्यांच्या आयुष्यातील आनंददायी क्षणांमध्ये सहभागी होणे ही आपली कर्तव्यभावना असल्याचे सांगत आ. दाते सरांनी नरसाळे कुटुंबीयांच्या आनंदात मनापासून सहभाग नोंदविला. त्यांच्या या आत्मीय भेटीमुळे परिसरात समाधान व अभिमानाची भावना व्यक्त करण्यात आली.



> डॉक्टर हा केवळ व्यवसाय नसून तो मानवतेची सेवा करण्याचा एक पवित्र ध्यास आहे, रुग्णाची वेदना कमी करणे हेच डॉक्टरांचे खरे यश आहे, जिथे आशा संपते, तिथे डॉक्टरांची सेवा नव्या आशेचा किरण बनते, ज्ञान, संयम आणि करुणा या तीन गोष्टी डॉक्टरांना समाजाचा खरा आधार बनवतात,डॉक्टर म्हणजे चालता-बोलता देव नाही, पण देवासारखी सेवा करणारा माणूस, समाज निरोगी असेल तर राष्ट्र मजबूत राहते आणि त्यामागे डॉक्टरांचे मोठे योगदान असते.
>
> **– आ. काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

# नोजे कुणबी समाज चंद्रपूर तर्फे भव्य क्रिकेट सामन्यांचे आज उदघाटन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज चंद्रपूर च्या वतीने (डीकेपीएल-सीझन-१) भव्य क्रिकेट सामन्यांचे आयोजन २३ फेब्रुवारी २०२६ ते ०१ मार्च २०२६ या कालावधित सेंट मायकल ग्राउंड, रामनगर, चंद्रपूर येथे केलेले आहे. या क्रिकेट सामन्यांचे (डीकेपीएल-सीझन-१) चे संयोजक संजय ढवस व त्यांची कार्यकारिणी आहे.

या भव्य क्रिकेट सामन्यांचे उदघाटन दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी सेंट मायकल ग्राउंड, रामनगर, चंद्रपूर येथे दुपारी ३.३० वाजता चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांची उपस्थिती लाभणार आहे.

तसेच धनोजे कुणबी समाज चंद्रपूर चे अध्यक्ष श्रीधरराव मालेकर, श्यामकांत थेरे, चंद्रकांत वासाडे, पवन राजूरकर, पांडूरंग टोंगे, दौलतराव भोंगळे, ॲड. प्रफुल आस्वले, सुनील देरकर, ॲड. गजानन बोढाले, डॉ. पांडूरंग जरीले, मंगेश रासेकर, यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.




या क्रिकेट सामन्यांचे संयोजक संजय ढवस व त्यांची कार्यकारिणी च्या वतीने सर्व क्रिकेट प्रेमींनी, मान्यवरांनी व नागरिकांनी, व धनोजे कुणबी समाजबांधवांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक स्पर्धेला उपस्थितीने गौरवावे, व धनोजे कुणबी समाजातील खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन केले आहे.

# निरंकारी संस्थेतर्फे बिना संगम तीर्थक्षेत्राचा कायापालट

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या कामठी तालुक्यातील बिना (संगम) येथे कन्हान, पेंच आणि कोलार या तीन नद्यांचा त्रिवेणी संगम असलेल्या परिसरात २२ फेब्रुवारी रविवारला भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. निरंकारी संस्थेच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून नद्यांचे पावित्र्य राखण्यासोबतच पर्यटकांना स्वच्छ परिसर उपलब्ध करून देण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला.

बिना संगम येथे दररोज अस्थिविसर्जनासाठी हजारो नागरिक येतात शिवाय याठिकाणी प्राचीन भोसलेकालीन शिव मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या परिसरात योग्य नियोजना अभावी या परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचला होता. ही बाब लक्षात घेऊन 'स्वच्छ जल, स्वच्छ संगम' या संकल्पनेतून निरंकारी संस्थेच्या शेकडो सेवाकरी बांधवांनी नदीपात्र आणि मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेतली.

या मोहिमेत सामाजिक कार्यकर्ते भिवा तांडेकर व सरपंच नारायण भडंग यांचे विशेष सहकार्य लाभले. श्री शिवभक्त सिद्धरिठ हनुमान मंदिर पंचकमेटीचे अध्यक्ष माणिक निखाडे यांच्यासह निखिल निखाडे, आयुष उपासे, शुभम तांडेकर, कवलेश चौरागडे, सोहेल शेख, निलेश तांडेकर आणि इतर कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला दिवसभर चाललेल्या या श्रदानातून सुमारे १५ ते २० बोलेरो पिकअप सुका आणि ओला कचरा जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली निरांकारी संस्थेच्या कार्यामूळे बिनासंगम परिसरात समाधान व्यक्त केल्या जात आहे.




> ● महाराष्ट्र शासनाचा क पर्यटन स्थळ दर्जा प्राप्त असलेल्या बिनासंगम परिसरात येणाऱ्या भाविक आणि पर्यटकांची गैरसोय होऊ नये हाच आमचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक दुकानदार आणि नागरिकांनीही यापुढे कचरा व्यवस्थापनात शिस्त पाळावी, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते भिवा तांडेकर यांनी केले.
>
> ● बिना संगम परिसरात झुणका-भाकर केंद्रांसह शेकडो छोटी-मोठी दुकाने आहेत. व्यावसायिकांनी आपल्या दुकाना भोवतीची स्वच्छता राखावी आणि निर्माण होणारा कचरा त्वरित नष्ट करावा असे आवाहन सरपंच नारायण भडंग आवाहन यांनी केले.

## गाव तेथे उद्योजक या विषयावर सिल्लेवाडा येथे कार्यशाळा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर व लायन्स क्लब पर्ल नागपूर तर्फे गाव तेथे उद्योजक या विषयावर कार्यशाळा महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार यांच्या अध्यक्षतेत महाराष्ट्र विद्यालय सिल्लेवाडा येथे संपन्न झाली.

या कार्यशाळेचा उद्देश ग्रामीण भागातील उद्योजक निर्माण करणे, व्यवसायाला गती देणे, नव्याने व्यवसायात येणाऱ्या उद्योजकांना मार्गदर्शन करणे, निर्मिती झालेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे, व्यवसायाला एम.ई.सी.मी मार्फत भांडवल उपलब्ध करून देणे हा होता.शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार यांनी आश्वासन दिले की, नव उद्योजकांना मार्गदर्शन करण्याचे केंद्र मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात सुरू होतील आणि व्यवसाय उद्योजक केंद्र लवकरच महाराष्ट्र विद्यालय सिल्लेवाडा येथे सुरू होणार आहे. कार्यशाळेत प्राध्यापक डॉ. राहुल खराबे, डॉ. गोपाल बैतुले, बंडू नांदेकर, मधुकर दुगाणे, श्यामप्रीत भारद्वाज, प्रकाश खापरे, मुरलीधर निंबाळकर, कपिल वानखेडे, रुपेश सावरकर, वंदना बेले, सविता भड, अरुण वडस्कर, पद्माकर राऊत, पुरुषोत्तम दोड इत्यादी उपस्थित होते.

